# उपविभागीय अधिकारी खेड यांचे कार्यालय,जिल्हा रत्नागिरी
# कोतवाल संवर्गातील पद भरतीसाठी जाहिरात 2023
## जाहिरात क्रमांक 1/2023

**रत्नागिरी** जिल्हयातील **खेड** उपविभागातील खेड तालुक्यातील तलाठी सजातील कोतवाल या संवर्गातील रिक्त पदे भरतीकरीता अर्हता धारक उमेदवारांकडून विहीत नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच **https:/khedrtn.ppbharti.in** या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक/संकिर्ण/2023/प्र.क्र.17/ई-10 दिनांक 17 मे 2023 अन्वये सन 2023 (कोतवाल पदभरती) बाबत कोतवाल संवर्गातील रिक्त असलेल्या पदांच्या 80 टक्के मर्यादेत पदे भरण्यास एक विशेष बाब म्हणुन शासनाने मान्यता दिलेली आहे.

**खेड तालुक्यातील कोतवाल (तात्पुरत्या स्वरूपात) रिक्त पदे** 08 (80% प्रमाणे भरावयाची पदे 7 )

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरूवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक 25/09/2023 वेळ 00-00 वा. पासून | दिनांक -09/10/2023 सांय 23.59 वा पर्यंत |

**ऑनलाईन पध्दतीने परिक्षाशुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक** 09/10/2023

कोतवाल भरती प्रक्रियेची सविस्तर जाहिरात **https:/khedrtn.ppbharti.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्जदाराने संपूर्ण प्रक्रिया काळजीपूर्वक समजून ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदाकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरच ऑनलाईन पध्दतीने भरलेले व विहीत परीक्षा शुल्क असलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे परीक्षा शुल्क स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिया दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहिती बाबत अद्ययावत व जागृत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

भरती प्रक्रिया परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, त्यात अंशत: बदल करणे, पदाच्या एकूण संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करणे याचे अधिकार तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद/तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार अध्यक्ष कोतवाल पदभरती समिती तथा उपविभागीय अधिकारी खेड यांना राहतील.

उपविभागीय अधिकारी खेड

(राजश्री मोरे)

**उपविभागीय अधिकारी खेड**
**तथा अध्यक्ष,कोतवाल पदभरती**
**प्रक्रिया समिती खेड 2023**